अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मॉरल पोलिसिंगपेक्षा मॉडेल पोलिसिंगचे समर्थन

समाजाची घडी केवळ कायदे, नियम किंवा बंधनांनी टिकून राहत नाही. ती नीटनेटकी ठेवायची असेल तर समाजाने व्यक्तीने स्वत:हून तयार केलेल्या नीतीनियमांची खूप आवश्यकता असते. व्यक्तीकडे समाजाकडे नीतिमत्ताच नसेल तर कितीही कायदे केले तर त्याचा प्रभाव किंवा परिणाम जाणवत नाही सध्याची परिस्थिती अशीच आहे. समाजात घडणाऱ्या खरे तर सतत वाढणाऱ्या अनिष्ट घटना पाहिल्या की नीतिमत्तेला कायमचे हद्दपार करण्याचा अट्टाहास दिसून येतो. सर्वप्रकारचे कायदे आणि नियम असूनही भ्रष्टाचारापासून ते महिलांवरील अत्याचारापर्यंत किंवा अगदी आई–वडिलांना घराबाहेर काढण्यापासून ते प्रचंड वेगाने वाढणारे घटस्फोट या सगळ्या प्रकारांची गोळाबेरीज करून नित्कर्ष काढायचा प्रयत्न केला तर केवळ कायद्याने सगळे काही ठाकठिक होईल असे म्हणता येत नाही. आज तर अशी अवस्था आहे की, समाजातल्या वेड्यावाकड्या गोष्टींविरुध्द तक्रार केली तर तक्रार करणाऱ्याविरुध्दच मोहीम उघडली जाते. समाजात काही चांगल्या गोष्टी टिकून राहाव्यात म्हणून काही लोक प्रयत्न करतात, परंतु त्यांच्यावर टीका आरोप केले जातात. जणूकाही कोणीही अशा नैतिकतेचे समर्थनही करू नये आणि रक्षकही बनू नये, असा प्रयत्न केला जातो. किंबहुना नैतिकतेच्या नावाने कोणताही पहारा किंवा देखरेख असता कामा नये. अशा प्रकारची मागणी सध्या जोर धरत आहे. महिलांवरच्या अत्याचाराच्या घटना एकीकडे वाढत असताना त्यांच्याकडून महिलांनी संरक्षणाची अपेक्षा करायची. त्यातलेच काही पोलीस अधिकारीसुध्दा महिलांच्याअसहाय्यपणाचागैरफायदाघेतानादिसतात. एखाद्या राजकारण्याने किंवा सामाजिक कार्यकर्त्याने विनाकारण चालणाऱ्या विकृत प्रकारांविरुध्द काही प्रयत्न सुरू केले. तर त्यालादेखील विरोध होतो. म्हणजे रेव पार्टीच्या नावाखाली चालणारे प्रकार ही आधुनिक समाजाची गरज आहे असे दाखवले जाते. बिअरबार पबमध्ये रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या मुलामुलींच्या पार्ट्या हा सगळा मॉडर्न पॅटर्न असल्याचे भासवले जाते.जणुकाही पाश्चात्य देशांमध्ये चालणारे हे सगळे चाळे आपल्याकडे आले म्हणजे आपण त्यांच्यासारखे प्रगत झालो किंवा आधुनिक झालो असा भंपकपणा करण्याचा प्रयत्न आवर्जून केला जातो. विशेषत: इंग्रजाळलेल्या मंडळींकडून या प्रकारच्या धांगडधिंग्याचे समर्थन होते.

### पोलिसांकडूनही गैरवर्तणूक

इतक्या वेगाने हे सगळे प्रकार वाढत आहेत की, जवळपास सगळ्याच प्रसारमाध्यमांमधून त्याचे समर्थन होताना दिसते. टीव्हीवरून दाखवल्या जाणाऱ्या सीरियल्स या विकृतीचाच प्रसार करणाऱ्या वाटतात.चित्रपटांनी तर नैतिकतेच्या कोणत्याच मर्यादा पाळायच्या नाहीत असा नियमच करून टाकलेला दिसतो. या सगळ्या प्रकारांच्या जोडीला इंटरनेट फेसबुक मोबाईल या सगळ्या माध्यमामधून अनावश्यक किंबहुना काहीवेळेला तर विभत्स आणि अश्लील प्रकारांचे खुलेआम प्रसारण होत राहते. त्यालादेखील आधुनिकता समजून समर्थन करण्याचा प्रयत्न होत आहे.एकीकडे स्त्री अत्याचाराच्या घटना वाढत असताना समाजातल्या मुळातच हिंसक वृत्ती असलेल्यांना आणखीनच वाव दिल्यासारखे होते. कोणत्याही प्रकारचे नैतिक मूल्यांचे समर्थन करण्याचा प्रयत्न झाला तरी तो उधळून लावला जातो. स्वाभाविकपणे या सगळ्या घटनांचे वेगाने परिणाम होत आहेत. तरुण–तरुणींमधला स्वैराचार तर वाढतो आहे. परंतु कायद्याचे संरक्षण मानल्या जाणाऱ्या पोलीस दलातही ही विकृती फोफावते आहे. पोलीस दलातल्याच एका उपअधीक्षकाचे एका मॉडेलशी असलेल्या संबंधांची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. तर बांद्राच्याच एका पोलीस उपनिरीक्षकाने तक्रार करण्यासाठी आलेल्या महिलेशीच मैत्री करून स्वत:वर निलंबन ओढवून घेतले. म्हणजे ज्या पोलिसांनी गैरप्रकारांविरुध्द मोहीम उघडली तर त्यांचे हे मॉरल पोलिसिंग ठरत होते. त्याची गरज नाही म्हणून समाजातल्याच इंग्रजाळलेला वर्ग केकाटत होता. आता तर पोलिसांपासून ते चित्रपट राजकारण्यांपर्यंत मॉरॅलिटीला म्हणजेच नीतिमत्तेला तिलांजली दिली जात आहे. हे एक नवीनच विकृतीचे मॉडेल पुढे येत आहे आणि मग मॉरल पोलिसिंग नको. पण मॉडेल पोलिसिंग चालेल अशा प्रकारचा आग्रहदेखील त्यातून निदर्शनाला येतो. गेल्या दोन चार वर्षांत तर चित्रपट आणि फॅशनच्या दुनियेतल्या मॉडेल्सवरही टीका आणि आरोप झाले आहेत. हा सगळा घटनांचा पाढा वाचल्यानंतर कोणालाही समाजातला चांगुलपणा टिकावा अशी जाणीव दिसत नाही. उलट प्रवाहाबरोबर वाहत जाण्याचे आकर्षण दिसून येते. काही दिवसांपूर्वीच गोव्यातल्या एका मंत्र्याने तिथल्या समुद्र किनाऱ्यावर उघड्या नागड्या फिरणाऱ्या मुलांविरुध्द तक्रारीचा सूर व्यक्त केला होता. परंतु त्याविरुध्दसुध्दा आरडाओरडा झाला. तिथे येणारे पाश्चात्य पर्यटक दुखावले जाऊ नयेत मग लागलीच तिथल्या मुख्यमंत्र्यांनीही खुलासा केला आणि अशा प्रकारची मॉरल पोलिसिंग गोव्यात होणार नाही असेही जाहीर करून टाकले.

### शाळा, कॉलेजेस आणि मोबाईल

आज अगदी शाळा कॉलेजेसमधूनसुध्दा याबाबतची चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच तामिळनाडूतल्या एका शाळेमध्ये प्राचार्यांनी शाळेच्या कालावधीत मोबाईलच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली यासंदर्भात त्यांनी काही निष्कर्ष काढले आणि विद्यार्थ्यांमध्ये वाढत जाणारी विकृती आणि विद्यार्थिनींवर येणारे अनाठायी प्रसंग याला सातत्याने होणारा मोबाईलचा वापर कारणीभूत आहे.असे त्यांनी स्पष्टपणे बजावले. दुर्दैव असे की, त्याविरुध्दसुध्दा काही इंग्रजाळलेल्या प्रसारमाध्यमांनी आरडाओरडा केला आणि हे सेन्सॉरशिप आहे. असे सांगून एकाअर्थी विकृतीचेच समर्थन केले आता शिक्षणासारख्या क्षेत्राचे पावित्र्य टिकवायचे असेल तर काही नियम लादण्याचे स्वातंत्र्य शाळेच्या मुख्याध्यापकांना किंवा व्यवस्थापकांना असले पाहिजे. अभ्यास, शिक्षण या गोष्टीपेक्षा विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित करणाऱ्या घटना घडतात. म्हणूनच त्याविरुध्द उपाययोजना करणे आवश्यक ठरते. एकूणच सामाजिक संस्कृतीला नख लावणाऱ्या या गोष्टी समाजाचेच चारित्र्यहनन करणाऱ्या आहेत. आपण येणाऱ्या पिढीसमोर मॉरल म्हणून कोणते मॉडेल ठेवणार आहोत याचा विचार केला पाहिजे. ही विकृती आणि व्यसनाधिनतेचे मॉडेल हेच उद्याचे मॉरल आहे. असे चित्र येणाऱ्या पिढीसमोर बिंबवणारे आहेत याचा निर्णय करण्याची वेळ आलेली आहे.